महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : २१९३(२)/२०२२/१९ दिनांक: २९ मे, २०२४.

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :-** महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२
गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत (Retotaling)

**संदर्भ :-** १. जाहिरात क्रमांक १५/२०२३, दिनांक २ मार्च, २०२३
२. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ९ मे, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ९ मे, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. विषयाधीन परीक्षेच्या अंतिम निकालामधून शिफारसपात्र व ना शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील 'Retotalling of Marks' या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या परीक्षेची निवड करून Save बटनवर क्लिक करावे.

(५) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक **दिनांक ३० मे, २०२४ ते दिनांक ८ जून, २०२४, २३.५९** या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या ७३०३८२१८२२ किंवा ०२२६९१२३९१४ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई